पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८.
मा. शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - ८**
सभावृत्तात

दिनांक :- १६ / ०८ / २०१२ वेळ :- दुपारी ३.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची पाक्षिक सभा गुरुवार दिनांक १६ / ०८ / २०१२ रोजी दुपारी ३.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.बो-हाडे शुभांगी संजय - सभापती

२) मा.सावळे सिमा रविंद्र

याशिवाय मा. चाकणकर - प्र. नगरसचिव हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.सभापती -** सभा कामकाज उरकणेसाठी आवश्यक गणसंख्या सभागृहात नसल्याने बुधवार दिनांक ०५/०९/२०१२ रोजी दुपारी २.४५ पर्यंत सभा तहकुब करणेत येत आहे.

**( बो-हाडे शुभांगी संजय )**
सभापती
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८.
मा. शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - ८**
सभावृत्तात
( दिनांक १६/०८/२०१२ ची तहकूब सभा )

दिनांक :- ०५ / ०९ / २०१२ वेळ :- दुपारी २.४५ वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची दिनांक १६/०८/२०१२ ची तहकूब सभा बुधवार दिनांक ०५ / ०९ / २०१२ रोजी दुपारी २.४५ वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. बो-हाडे शुभांगी संजय - सभापती
२) मा. काळजे नितीन प्रताप
३) मा. यमुनाताई रमणनाना पवार
४) मा. प्रशांत शितोळे
५) मा. बहिरवाडे नारायण सदाशिव
६) मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
७) मा. सावळे सिमा रविंद्र

याशिवाय मा.गावडे - सहा.आयुक्त, मा. चाकणकर - प्र. नगरसचिव, मा.तांबे, मा.ढगे - कार्यकारी अभियंता, मा.शिंपी - नगररचनाकार, मा.लावंड - कायदा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक :- मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक :- मा.सिमा सावळे

शुक्रवार दिनांक ०७/०९/२०१२ दुपारी ४.०० पर्यंत सभा तहकूब करणेत यावी.
सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**मा.सभापती -** शुक्रवार दिनांक ०७/०९/२०१२ दुपारी ४.०० पर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**( बो-हाडे शुभांगी संजय )**
सभापती
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८.
मा. शहर सुधारणा समिती
**कार्यपत्रिका क्रमांक - ८**
सभावृत्तात
( दिनांक १६/०८/२०१२ व ०५/०९/२०१२ ची तहकूब सभा )

दिनांक :- ०७ / ०९ / २०१२ वेळ :- दुपारी ४.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. शहर सुधारणा समितीची दिनांक ०५/०९/२०१२ ची तहकूब सभा शुक्रवार दिनांक ०७ / ०९ / २०१२ रोजी दुपारी ४.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. बो-हाडे शुभांगी संजय - सभापती
२) मा. काळजे नितीन प्रताप
३) मा. यमुनाताई रमणनाना पवार
४) मा. प्रशांत शितोळे
५) मा. बहिरवाडे नारायण सदाशिव
६) मा. लोंढे गणेश नारायण
७) मा. म्हेत्रे सुरेश रंगनाथ
८) मा. सावळे सिमा रविंद्र

याशिवाय मा.परदेशी - आयुक्त, मा.गावडे - सहा.आयुक्त, मा.कांबळे - प्र.शहर अभियंता, मा. चाकणकर - प्र. नगरसचिव, मा.काची - सह शहर अभियंता, मा.भदाणे - उपसंचालक नगररचना, मा.पाटील, मा.तांबे, मा.ढगे - कार्यकारी अभियंता, मा.शिंपी - नगररचनाकार, मा.लावंड - कायदा अधिकारी, मा.बाबा बागल - प्रशासन अधिकारी, मा.देशमुख - कायदा सल्लागार, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**दिनांक ०१/०८/२०१२ व ०२/०८/२०१२ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ७ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.**

----------

ठराव क्रमांक :- ४८ विषय क्रमांक :- १
दिनांक :- ०७/०९/२०१२ विभाग :- नगररचना व विकास
सुचक :- मा.नारायण बहिरवाडे अनुमोदक :- मा. सिमा सावळे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/पिंपरी/१२७/२०१२, दि.०३/०७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मौजे पिंपरी, ता.हवेली येथील सि.स.नं.५७४३ पै., आरक्षण क्रमांक ११० दुकानदारांचे पुनर्वसन आरक्षणाने बाधित जमिन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ व भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये संपादन करणेकामी सदर भूसंपादन प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे पाठविणेस मान्यता देणेकामी मा. महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ४९ विषय क्रमांक :- २
दिनांक :- ०७/०९/२०१२ विषय :- नगररचना व विकास
सुचक :- मा. प्रशांत शितोळे अनुमोदक :- मा. नितीन काळजे
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/२क/६०/२०१२, दि.०९/०७/२०१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मौजे भोसरी (कासारवाडी) येथील पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सुधारीत मंजूर विकास योजनेमध्ये स.नं.४९९ पै, ५०० पै या मिळकती मध्ये आरक्षण क्रमांक २९ बहुउद्देशिय सभागृहासाठी ०.३५ हे क्षेत्र आरक्षित आहे. सदर आरक्षणावर झोपडपट्टी आहे. सदर आरक्षित जागेवर सभागृह बांधून मिळणेकामी स्थानिक मा. नगरसदस्यांनी मागणी केलेली आहे. तरी सदर आरक्षणाचे महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम १२६(१) व भूसंपादन अधिनियम १८९४ अन्वये भूसंपादन करण्यास मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक :- ५० विषय क्रमांक :- ३
दिनांक :- ०७/०९/२०१२ विषय :- नगररचना व विकास
सुचक :- मा. सिमा सावळे अनुमोदक :- मा. यमुनाताई पवार
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/रहाटणी /४९३/२०१२, दि.२०/०७/२०१२

विषय - मौजे रहाटणी (काळेवाडी) ता.हवेली, जि.पुणे येथील प्रस्तावित रस्त्यांखालील जमिनीचे भूसंपादना बाबत...

विषय क्रमांक ३ चा विचार पुढील सभेच्यावेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**( बो-हाडे शुभांगी संजय )**
सभापती
शहर सुधारणा समिती
पिंपरी चिंचवड मनपा, पिंपरी १८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८, नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस / ४ / कावि / ११६३ / २०१२
दिनांक :- ०७ / ०९ / २०१२

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत :- सर्व संबंधीत शाखा प्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

\\Nagersachiv४\nnn\Nagersachiv१/shsu-११-१२\proceeding८doc